रयत शिक्षण संस्था, सातारा
जा.नं.जन- ४३४६९
दि. ०६/०३/२०१८

प्राचार्य ,
सर्व महाविद्यालये,
रयत शिक्षण संस्था

यांना . .

विषय - **पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविणेबाबत .**

ती.कर्मवीर अण्णा, बॅरि.पी.जी.पाटील यांचे विचार डोळयासमोर ठेवून कार्य करण्याची सेवकांना प्रेरणा मिळावी म्हणून प्रा.सौ.पुष्पा विजय जंगम यांनी प्राध्यापकांसाठी ' **प्राचार्य एम.एम.स्वामी पुरस्कृत, बॅरि. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार** ' देण्यासाठी संस्थेकडे रु.१,००,१०१/-(रु.एक लाख एकशे एक ) तसेच संस्थेचे माजी सचिव प्रिं. एम.एम.स्वामी यांनी प्राध्यापिकांसाठी ' **श्री सिध्दाश्रम पुरस्कृत प्राचार्या सौ.सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार** ' देण्यासाठी रु.१,००,०००/- (रु.एक लाख ) कायम ठेव ठेवलेली आहे. या दोन्ही ठेवींच्या व्याजातून संस्थेच्या सर्व महाविद्यालयातून दरवर्षी एका आदर्श प्राध्यापक व प्राध्यापिकेस वरील पुरस्कार दिले जातात. **सदरचे पुरस्कार दि.२ जुलै,२०१८ रोजी बॅरि.पी.जी.पाटील यांच्या स्मृतीदिनी दिले जाणार आहेत.**

**बॅरि. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कारासाठीचे निकष पुढीलप्रमाणे :**

सदर पुरस्कारासाठी खालील निकषास पात्र असणा-या वरिष्ठ महाविद्यालयात काम करणा-या प्राध्यापकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

१. सदर प्राध्यापकाने संस्थेच्या किंवा संस्थेबाहेरील कमवा व शिका योजनेतून किंवा स्वावलंबनाने आपले शिक्षण पूर्ण केलेले असावे.

२. संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयात काम करणा-या सदर प्राध्यापकाची संस्थेतील किमान सेवा १८ ते २० वर्षे झालेली असावी .

३. पुरस्कार विजेत्याची निवड करताना त्याचा संस्थेच्या व महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमातील सक्रिय सहभागाचा प्राधान्याने विचार केला जाईल.

**प्राचार्या सौ.सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारासाठीचे निकष पुढीलप्रमाणे -**

१. सदर प्राध्यापिका कर्मवीर अण्णांच्या व संस्थेच्या ध्येय धोरणानुसार सामाजिक बांधिलकीतून काम करणारी असावी .

२. हा पुरस्कार संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयात किमान २० वर्षे काम करणा-या प्राध्यापिकेस द्यावयाचा आहे.

३. ज्यांना हा पुरस्कार द्यावयाचा आहे, ती प्राध्यापिका शक्यतो पीएच.डी.धारक असावी. परंतु फक्त पीएच.डी. ही पात्रता अत्यावश्यक असणार नाही .

४. सदर प्राध्यापिका शैक्षणिकदृष्टया अत्यंत दक्ष व विद्यार्थिप्रिय असावी.

५. संस्थेने चालविलेल्या उपक्रमांत उदा. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, कॅालेजच्या दैनंदिन शिकविण्याच्या कामाशिवाय इतर उपक्रमात (एन.सी.सी., एन.एस.एस.,साक्षरता प्रसार, लोकसंख्या नियंत्रण, अंधश्रध्दा निर्मूलन, सामाजिक प्रबोधन व परिवर्तन ) सक्रीय सहभाग असावा.

६. सामाजिक बांधिलकीतून आपल्या महाविद्यालय परिसरातील स्त्रीयांचे परिवर्तनासाठी व इतर बौध्दिक परिवर्तनासाठी व्याख्याने, कृती शिबिरे, लिखाण यांचेद्वारे केलेले काम विचारात घ्यावे.

वरील दोन्ही पुरस्कारासाठी आपल्या महाविद्यालयातील पात्र प्राध्यापक व प्राध्यापिका यांची माहिती सोबतच्या नमुना फॉर्ममध्ये भरुन घेऊन आपल्यामार्फत दि.३१/०३/२०१८ पर्यंत संस्था कार्यालयाकडे पाठवून द्यावी. सदर पत्रासोबत आपली शिफारस स्वतंत्र पत्राने पाठवून द्यावी त्यामध्ये संबंधितांचे काम, संस्थानिष्ठा, ते कृतज्ञता निधी कधी पासून व किती देतात, कर्मवीर निधी देतात काय ? संस्थेच्या आवाहनास प्रतिसाद देतात काय ? याबाबतचा आपला स्पष्ट अभिप्राय पाठवावा .

**सोबत- दोन फॅार्म**

faculty notice

16/3/2018

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

टीप - सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणून त्यावर त्यांच्या सहया घ्याव्यात व त्याची प्रत ई-मेलद्वारे दि. २०/०३/२०१८ पर्यंत कार्यालयाकडे पाठवून द्यावी.

स्वामी/सर्क्युलर ७०

Rayat Shikshan Sanstha's ... Of ... Management ... tara
Inward No 1177/18
Date - 16 MAR 2018

फोटो

# " प्राचार्य एम.एम.स्वामी पुरस्कृत, बॅरि. पी.. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार "

पुरस्कारासाठीच्या माहितीचा फॅार्म . . . . . .

1. संपूर्ण नाव -

2. शैक्षणिक पात्रता -

3.कमवा व शिका योजनेतून किंवा स्वावलंबनाने शिक्षण पूर्ण केले संदर्भातील कागदपत्र -

4. नेमणूक तारीख -
   संस्थेतील एकूण सेवा -

5. संस्थेच्या व महाविद्यालयाच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्यातील सहभाग -
   (स्पर्धा परीक्षा, एन.एस.एस., एन.सी.सी.वाचन संस्कृतिवाढीसाठी केलेले प्रयत्न , प्रसिध्द केलेले शोध निबंध, संशोधनात्मक कार्य, केलेले लिखाण )

6. संस्थानिष्ठा ( संस्थेच्या निरनिराळया उपक्रमातील सहभाग ) -

7. सामाजिक कार्य -
   (साक्षरता प्रसार, लोकसंख्या नियंत्रण, अंधश्रध्दा निर्मूलन, सामाजिक प्रबोधन , व परिवर्तनासाठी केलेले लिखाण, दिलेली व्याख्याने )

8. शास्त्रीय दृष्टीकोन वाढीसाठी केलेले
   शैक्षणिक व सामाजिक प्रयत्न -

9. वरील महिती व्यतिरिक्त केलेली
   वैशिष्टयपूर्ण कामे -

अर्जदाराची सही

प्राचार्यांची सही व शिक्का

टीप- अर्जावर आपला फोटो लावावा व अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या संदर्भात योग्यत्या कागदपत्रांच्या साक्षांकित झे-रॅाक्सप्रती पुराव्या दाखल जोडाव्यात.

Secular3

**फोटो**

श्री सिध्दाश्रम पुरस्कृत प्राचार्या सौ.सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारासाठीच्या माहितीचा फॅार्म . . . . . .

1. संपूर्ण नाव -

2. शैक्षणिक पात्रता -

3. नेमणूक तारीख -
   संस्थेतील एकूण सेवा -

4. संस्थानिष्ठा व शैक्षणिक कार्य -

5. केलेले लिखाण, दिलेली व्याख्याने व
   प्रसिध्द केलेले शोध निबंध -

6. सामाजिक कार्य -
   (स्पर्धा परीक्षा, एन.एस.एस., एन.सी.सी.,
   साक्षरता प्रसार, लोकसंख्या नियंत्रण, अंधश्रध्दा
   निर्मूलन, सामाजिक प्रबोधन व परिवर्तन )

1. शास्त्रीय दृष्टीकोन वाढीसाठी केलेले
   शैक्षणिक व सामाजिक प्रयत्न -

2. वरील महिती व्यतिरिक्त केलेली
   वैशिष्टयपूर्ण कामे -

अर्जदाराची सही

प्राचार्यांची सही व शिक्का

टीप- अर्जावर आपला फोटो लावावा व अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या संदर्भात योग्यत्या कागदपत्रांच्या साक्षांकित झे-रॉक्सप्रती पुराव्या दाखल जोडाव्यात.

Sercular3